2

क्षय रोग, कॅन्सर इत्यादि दुर्धर रोगांनी आजारी असलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना आर्थिक मदत देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक पीओजेस-१९९०/६१४/सीएमएस/स्वासैकक्ष,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ९ सप्टेंबर, १९९१.

वाचा:- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: पीओजेस-१२८३/विक-१/स्वासैकक्ष, दिनांक २१.११.१९८३.

शासन निर्णय:- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-पीओजेस-१२८३/विक-१/स्वासैकक्ष, दिनांक २१.११.८३ अन्वये क्षय रोग, कॅन्सर इ. दुर्धर रोगांनी आजारी असलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना एकरकमी रु.२,०००/- मदत देण्यात येते. दुर्धर रोगांनी आजारी असलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना उपचारार्थ देण्यात येणा-या एकरकमी अनुदानात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्याबाबत शासनाने आता निर्णय घेतला आहे की, दुर्धर रोगांनी आजारी असलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना रु.२०००/- ऐवजी एकरकमी रु.३,०००/- मदत देण्यात यावी. ही मदत फक्त एकदाच देय आहे व यापूर्वी [रु.२०००/- एकरकमी] मदतीचा लाभ घेतलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रकरणी वाढीव मदत अनुज्ञेय होणार नाही.

२. या बाबीवर होणारा खर्च, "२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण [१०२] [१] स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती इत्यादींना निवृत्ती-वेतन, मागणी क्रमांक-ए-१४" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. हे आदेश निर्गमित केलेल्या दिनांकापासून अंमलात येतील. उपरोक्त आदेशान्वये रक्कम मंजूर करण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना देण्यात येत आहेत.

४. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर-३७३/व्यय-४, दिनांक ८.४.९१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[व.ज. गांवकर]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव,

[कृ. मा. प.]